**लोकनाटय / तमाशा मंडळ, भजन, किर्तन, प्रवचन या कार्यक्रमास परवानगी देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- ध्वनीप्र २००८/प्र.क्र.१३/०८/ तां.क १
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला,
मंत्रालय, मुंबई
दिनांक :- १२ मे, २००८

वाचा :- १) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र. एसओ १२३(ई) दिनांक १४ फेब्रुवारी, २०००
२) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र. एसओ १०८८ (ई) दिनांक ११ ऑक्टोबर, २००२
३) शासन पत्र क्र. ध्वनिप्र २००५/प्र.क्र. १८५/०५/तां.क.१ पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ दिनाक. ७ ऑक्टोबर, २००५

**प्रस्तावना :-** केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या नियम २(ब) व ३(१) नुसार वर्गीकृत केलेल्या क्षेत्रांमध्ये नियम ५(२) नुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, मेजवानी कक्ष या सारख्या बंद जागांखरीज इतर ठिकाणी रात्री १०.०० पासून सकाळी ६.०० वाजेपर्यत करता येत नाही. गावापासून अर्धा कि.मी. दूरवरचे क्षेत्रामध्ये बंदीस्त तंबूमध्ये लोकनाटय किंवा तमाशाचे कार्यक्रमासाठी हरकत नसावी असा दिनांक ७ ऑक्टोबर, २००५ च्या पत्रान्वये शासनाने निर्णय घेतला होता.

गावापासून अर्धा किलोमीटर दूरवरचे क्षेत्र, ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील कोणत्याही झोन मध्ये मोडत नसल्याने तसेच, राज्यातील ग्रामीण भागात लोककलेचे व धार्मिकतेचे अस्तित्व टिकविणे व संवर्धन करणे यासाठी भजन, किर्तन, प्रवचन या कार्यक्रमांना ही दि. ७ ऑक्टोबर, २००५ च्या पत्राच्या अनुषंगाने परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यासाठी शासन पत्र दि. ७ ऑक्टोबर, २००५ मध्ये खालील प्रामणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-** लोकनाट्य, तमाशा मंडळाचे कार्यक्रम तसेच भजन, किर्तन, प्रवचन या कार्यक्रमांना ग्रामीण भागामध्ये समाज प्रबोधन व लोकजागृती मध्ये महत्वाचे स्थान आहे. या कार्यक्रमांसही ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास पुढील अटी व शर्तीस अधीन राहून शासन परवानगी देत आहे.

१. हे कार्यक्रम गावठाण क्षेत्रापासून कमीतकमी अर्धा किलोमीटर दूर अंतरावर आयोजित करण्यात यावेत.

RSTM | H-1664 (400-7-08)-1

(कृ.मा.प.)

२. ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील तरतुदीनुसारी वर्गीकृत करण्यात आलेल्या क्षेत्र (झोन) मध्ये हे कार्यक्रम रात्री १०.०० वाजल्यानंतर करता येणार नाहीत. अशा झोन व्यतिरिक्तच्या इतर क्षेत्रामध्ये कार्यक्रम आयोजनाने गावामध्ये ध्वनीप्रदूषणाचा त्रास जाणवू नये यासाठी हे कार्यक्रम बंदीस्त तंबूमध्ये रात्री १२.०० वाजेपर्यत आयोजीत करण्यात यावेत.

३. ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार निवासी क्षेत्रासाठी विहित केलेली ध्वनीमर्यादा, या कार्यक्रमांच्या वेळीही पालन करण्यात यावी.

४. स्थानिक पोलिस स्टेशन यांनी वर नमुद केलेल्या बाबींची पुर्तता होण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

हे आदेश हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Varade

(ग.नि.वराडे)
संचालक, पर्यावरण

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मां. मंत्री / राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव
अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग
प्रधान सचिव, गृह विभाग
प्रधान सचिव, सामाजिक न्याय सांस्कृतीक कार्य विभाग,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व पोलिस आयुक्त,
पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक,
सर्व मंत्रालयीन विभाग,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी),
संचालक, मुंबई दुरदर्शन केंद्र वरळी, मुंबई, (प्रसिध्दीसाठी)
संचालक, आकाशवाणी, मुंबई (प्रसिध्दीसाठी),
निवडनस्ती

—x—

H-1664-19.